राष्ट्रीय छात्रसेनेच्या सर्वोत्कृष्ट छात्र सैनिकांच्या शिष्यवृत्ती पुरस्कारात वाढ करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक :- राछासे २७१७/प्र.क्र.१५०/क्रीयुसे-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०६ जुलै, २०१९.

वाचा :-

१) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एनसीसी १७९५/२४४/(१८३७/९५)/सा.शि-५ दि. ४ जून,१९९७.

२) क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे पत्र क्र. राछासे/शिष्यवृत्ती/२०१२-१३/(१४)/का-५/३९४१ दि. ४ ऑगस्ट, २०१७.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय छात्रसेनेच्या वरीष्ठ व कनिष्ठ विभागांतील सर्वोत्कृष्ट छात्रसैनिकांना (मुले व मुली) उत्तेजनार्थ शिष्यवृत्ती पुरस्कार प्रदान करण्यांची योजना शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक :- एनसीसी-१९७३/३०६१७-बी, दिनांक २१/१०/१९७४ अन्वये सुरु करण्यांत आली. तद्नंतर कालपरत्वे त्या आदेशात वेळोवेळी सुधारणा करण्यांत आल्या. संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णयान्वये मंजूर करण्यांत आलेल्या राष्ट्रीय छात्रसेनेतील सर्वोत्कृष्ट छात्रसैनिकांच्या (मुले व मुली) शिष्यवृत्ती पुरस्काराच्या दरात वाढ करण्याची बाब या नस्तीवर विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय छात्रसेनेतील सर्वोत्कृष्ट छात्रसैनिकांच्या शिष्यवृत्ती पुरस्काराच्या दरात खालीलप्रमाणे वाढ करणेसाठी मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	विभाग	छात्रांची संख्या	प्रचलित दर	सुधारीत दर
१	वरीष्ठ विभाग	३७ मुले ०८ मुली ४५ एकूण	रु.७५०/- प्रत्येकी	रु. १५००/-प्रत्येकी
२	कनिष्ठ विभाग	७३ मुले ०७ मुली ८० एकूण	रु.५००/- प्रत्येकी	रु.१०००/- प्रत्येकी
	एकूण			

अ) राष्ट्रीय छात्रसेनेच्या वरीष्ठ विभागातील ३७ मुलांना व ८ मुलींना प्रत्येकी रु. १५००/- या दराने शिष्यवृत्ती पुरस्कार देण्यांत यावेत.

ब) राष्ट्रीय छात्रसेनेच्या कनिष्ठ विभागातील ७३ मुलांना व ७ मुलींना प्रत्येकी रु. १०००/- या दराने शिष्यवृत्ती पुरस्कार देण्यांत यावेत.

२. राष्ट्रीय छात्र सेनेतील सर्वोत्कृष्ट छात्रसैनिकांच्या (मुले-मुली) शिष्यवृत्ती-पुरस्कार रकमेमध्ये सुधारित दर सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यांत यावेत.

३. १ जून ते ३१ मे या शैक्षणिक वर्षाच्या कालावधीतील राष्ट्रीय छात्र सैनिकांच्या कामगिरींचे मूल्यमापन करुन संबंधितांनी राष्ट्रीय छात्र सैनिकांची (मुले व मुली) शिष्यवृत्ती पुरस्कारासाठी निवड करावी.

४. सर्व राष्ट्रीय छात्रसेनेच्या गटमुख्यालयाच्या गटप्रमुखांनी शिफारशी केल्यानंतर, उपमहासंचालक, राष्ट्रीय छात्रसेना संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी निर्धारीत संख्येच्या मर्यादेत सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय छात्र सैनिकांची (मुले व मुली) निवड करुन शिष्यवृत्ती पुरस्कार देण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत शासनास मान्यतेसाठी सादर करावा.

५. याबाबत होणारा खर्च मागणी क्र. ई-३, २२०४-क्रीडा व युवक सेवा-१०२ विद्यार्थ्यांकरीता युवक कल्याण कार्यक्रम (०१)(०१) राष्ट्रीय छात्रसेना, योजनेतर, उपशिर्ष- शिष्यवृत्त्या/विद्यावेतने (२२०४ ००१६-३४) या लेखाशिर्षाखाली त्या त्या वर्षीच्या मंजूर अनुदानातून करण्यांत यावा.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र ३९८/१९/व्यय-५, दिनांक १७/०६/२०१९ अन्वये निर्गमित करण्यांत येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०७०६१७११२०३४२१ आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra
Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.07.06 17:17:03 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. उपमहासंचालक, राष्ट्रीय छात्रसेना संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. अतिरिक्त महासंचालक, राष्ट्रीय छात्रसेना, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई
५. महालेखापाल, महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
६. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
७. मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
८. सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा
९. सर्व गटप्रमुख, राष्ट्रीय छात्रसेना
१०. सर्व समादेशक अधिकारी, राष्ट्रीय छात्रसेना
११. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१२. निवड नस्ती(क्रीयुसे-३)